नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २५० | Issue - 250 | वार रविवार दि. २६ जानेवारी २०२५ | Blow- Sunday Date 26 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा; महाराष्ट्रातील तिघांचा समावेश



## अरुण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने आज (२५ जानेवारी) प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्कारांमध्ये देशातील विविध ठिकाणी आणि विविध क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गजांचा समावेश आहे. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येच्या भाषणानंतर या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

पुरस्कारांमध्ये स्वातंत्र्यसैनिक, शेतकरी आणि पॅरालिम्पियनमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे. या पुरस्कारामध्ये महाराष्ट्रातील मारूती चित्तमपल्ली, होमिओपॅथी चिकित्सक डॉ. विलास डांगरे यांचा समावेश आहे. या बरोबरच शैली होळकर, डॉ.नीरजा भाटला, भीमसिंह भावेश, थविल वादक पी.दत्चनमूर्ती, शेखा एजे अल सबा, एल हँगथिंग, भैरूसिंग चौहान, जगदीश जोशीला, सेनानी लिबिया लोबो सरदेसाई, हरविंदर सिंग यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर दिलं आहे.

दरम्यान, भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या पद्म पुरस्कारामध्ये पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री पुरस्कारांचा समावेश असतो. या पुरस्कारांची घोषणा झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येत असते. आज जाहीर झालेल्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील होमिओपॅथी चिकित्सक डॉ.विलास डांगरे यांच्यासह मारुती चितमपल्ली, चैत्राम पवार यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

दरम्यान, डॉ.विलास डांगरे हे होमिओपॅथिक डॉक्टर आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवा देत आहेत. त्यांनी आतापर्यंत जवळपास एक लाखांपेक्षा जास्त रुग्णांवर उपचार केले आहेत. ते गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांवर उपचार करतात. त्याचबरोबर मारुती चितमपल्ली यांनाही पद्मश्री जाहीर झाला आहे. मारुती चितमपल्ली हे ज्येष्ठ साहित्यिक आहेत. तसेच चैत्राम पवार यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. ते वन आणि वन्यजीवाच्या संवर्धनासाठी काम करतात.

## गोरेगावमध्ये फर्निचर मार्केटमध्ये आग; आगीची तीव्रता आणखी वाढली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई :गोरेगाव पूर्व येथील खडकपाडा फर्निचर मार्केटमध्ये शनिवारी सकाळी ११.१५ च्या सुमारास भीषण आग लागली. लाकडी वस्तूचे समान ठेवलेल्या पाच ते सहा गाळ्यांना आग लागली असून आगीची तीव्रता वाढली आहे. तब्बल दोन हजार चौरस मीटर परिसरात ही आग पसरली आहे.



गोरेगाव पूर्वेकडे रहेजा इमारत परिसरात खडकपाडा येथील फर्निचर मार्केटमध्ये सकाळी अचानक मोठी आग लागली. आगीमुळे आसपासच्या परिसरात धुराचे लोट पसरले होते. घटनास्थळी अग्निशमन दलाचा ताफा आग विझवण्याचे काम करीत आहे. आठ फायर इंजिन, पाण्याचे पाच ट्रँन्कर घटनास्थळी असून आगीची तीव्रता वाढल्याचे अग्निशमन दलाने जाहीर केले आहे.

या आगीत लाकडी सामान, प्लास्टिक, थर्माकोल, प्लायवुड, भंगार सामान आदी मोठ्या प्रमाणावर जळून खाक झाले. अग्निशमन दलाने ११.१८ च्या सुमारास आगीसाठी श्रेणी १ ची वर्दी दिली होती. मात्र आगीची तीव्रता वाढताच ११.२४ वाजता आगीची श्रेणी क्रमांक २ ची वर्दी देण्यात आली. क्षणाक्षणाला आग अक्राळविक्राळ रुप धारण करीत होती. अग्निशमन दलाने अखेर ११.४८ च्या सुमारास श्रेणी ३ ची वर्दी दिली. अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत.

## थोडक्यात...

### आर अश्विनला पद्मश्री पुरस्कार, हॉकीपटू पीआर श्रीजेशला पद्मविभूषण जाहीर

नवी दिल्ली : २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला आज (२५ जानेवारी) रोजी पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यामध्ये विविध क्रीडाक्षेत्रातील क्रीडापटूंना पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. भारताचा माजी हॉकी गोलरक्षक पीआर श्रीजेश याला पद्मभूषण तर आर अश्विन आणि फुटबॉल दिग्गज आयएम विजयन यांना शनिवारी २५ जानेवारीला पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. पॅरा खेळाडू हरविंदर सिंग आणि सत्यपाल सिंग यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पद्म पुरस्कार हे भारतातील सर्वात प्रतिष्ठित नागरी सन्मानांपैकी एक आहेत, जे पद्म विभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या तीन श्रेणींमध्ये प्रदान केले जातात. कला, समाजसेवा, सार्वजनिक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य, वैद्यक आणि साहित्य यासारख्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कारांचा गौरव केला जातो. भारतातील चौथ्या क्रमांकाचा नागरी पुरस्कार म्हणून पद्मश्री, पद्मविभूषण आणि पद्मभूषण या पदानुक्रमानुसार प्रदान केले जातात.


## रवींद्र सिंगल, दत्तात्रय कराळे यांना राष्ट्रपती पदक, महाराष्ट्र पोलीस दलाला एकूण ४३ पदके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला अप्पर पोलीस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल, महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, महानिरीक्षक सुनील फुलारी, कमांडंट रामचंद्र केंदे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. महानिरीक्षक संजय दराडे, महानिरीक्षक आरती सिंह यांच्यासह महाराष्ट्रातील ३९ पोलीसांना गुणवर्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर करण्यात आले आहे.

देशात पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक आणि नागरी संरक्षण आणि सुधार सेवेतील एकूण ९४२ कर्मचाऱ्यांना शौर्य/सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये पोलीस दलासाठी एकूण ७९७ पदकांचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस दलाला एकूण ४३ पदके मिळाली आहे. राज्य पोलीस दलातील अप्पर महासंचालक डॉ. रवींदरकुमार सिंगल, महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, महानिरीक्षक सुनील फुलारी आणि कमांडंट रामचंद्र बाबू केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

गुणवर्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झालेल्या राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांची यादी पुढील प्रमाणे - १. संजय भास्कर दराडे, महानिरीक्षक २. वीरेंद्र मिश्रा, महानिरीक्षक ३. आरती प्रकाश सिंह, महानिरीक्षक ४. चंद्रकिशोर रामजीलाल मिना, महानिरीक्षक ५. दीपक कृष्णाजी साकोरे, उपमहानिरीक्षक ६. राजेश रामचंद्र बनसोडे, पोलीस अधीक्षक ७. सुनील जयसिंग



तांबे, पोलीस उपअधीक्षक ८. ममता लॉरेन्स डिसूझा, सहाय्यक पोलीस आयुक्त ९.धर्मपाल मोहन बनसोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त १०. मधुकर माणिकराव सावंत, निरीक्षक ११. राजेंद्र कारभारी कोते, निरीक्षक १२. रोशन रघनाथ यादव. पोलीस उपअधीक्षक १३. अनिल लक्ष्मण लाड, पोलीस उपअधीक्षक १४. अरुण केरभाऊ डुंबरे, सहाय्यक पोलीस आयुक्त १५. नजीर नासीर शेख, उपनिरीक्षक १६. श्रीकांत चंद्रकांत तावडे, उपनिरीक्षक १७. महादेव गोविंद काळे, उपनिरीक्षक १८. तुकाराम शिवाजी निंबाळकर, उपनिरीक्षक १९. आनंदराव पुंजाराव मस्के, सहाय्यक उपनिरीक्षक २०. रवींद्र बाबुराव वानखडे, उपनिरीक्षक २१. सुरेश चिंतामण मनोरे, निरीक्षक २२. राजेंद्र देवमान वाघ, उपनिरीक्षक २३. संजय अंबादासराव जोशी, सहाय्यक उपनिरीक्षक २४. दत्तू एकनाथ गायकवाड, सहाय्यक उपनिरीक्षक २५. नंदकिशोर ओंकार बोरोले, सहाय्यक उपनिरीक्षक २६. आनंद रामचंद्र जंगम, सहाय्यक उपनिरीक्षक २७. सुनीता विजय पवार, सहाय्यक उपनिरीक्षक २८. जितेंद्र विठ्ठल म्हात्रे, सहाय्यक उपनिरीक्षक २९. प्रफुल्ल रामचंद्र सुर्वे, सहाय्यक उपनिरीक्षक ३०. राजेंद्र शंकर काळे, सहाय्यक उपनिरीक्षक ३१. सलीम गनी शेख, सहाय्यक उपनिरीक्षक ३२. तुकाराम रावसाहेब आव्हाळे, सहाय्यक उपनिरीक्षक ३३. रामभाऊ संभाजी खंडागळे, हेड कॉन्स्टेबल ३४. संजय भास्करराव चोबे, हेड कॉन्स्टेबल, ३५. सय्यद इक्बाल हुसेन सय्यद माथार हुसेन, सहाय्यक उपनिरीक्षक ३६. विजय दामोदर जाधव, हेड कॉन्स्टेबल ३७. रामराव वामनराव नागे, सहाय्यक उपनिरीक्षक ३८. दिलीप भोजुसिंग राठोड, हेड कॉन्स्टेबल ३९.आयुबखान अकबर मुल्ला, हेड कॉन्स्टेबल

केंद्रीय गृहविभागाने यावेळी ९५ शौर्य पदके जाहीर केली आहेत. ७८ पोलीस कर्मचारी आणि १७ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांना ही पदके प्रदान करण्यात येणार आहेत. नक्षलग्रस्त भागातील २८ जणांचा, जम्मू आणि काश्मीरमधील २८ जणांचा यात समावेश आहे. पण, महाराष्ट्राला एकही शौर्य पदक मिळालेले नाही.

## भारत-इंडोनेशियामध्ये अनेक क्षेत्रात सामंजस्य करार; द्विपक्षीय संबंध दृढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत आणि इंडोनेशिया यांच्यामध्ये द्विपक्षीय संबंधांमध्ये अजून दृढता आली आहे. आज दोन्ही देशामंध्ये अनेक करार झाले आहेत. भारत-इंडोनेशियाने संरक्षण उत्पादन आणि पुरवठा साखळीच्या क्षेत्रात संयुक्तपणे काम करण्याचे ठरविले आहे. दोन्ही देशांमध्ये झालेले करार चीनसाठी मोठा संदेश मानला जात आहे.इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांता हे प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहूणे असून ते तीन दिवसाच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्याशी चर्चाही केली.

पंतप्रधान मोदी यांनी इंडोनेशियाला १० देशांच्या आसियान ब्लॉकच्या सोबत इंडो- पॅसिफिक क्षेत्रात भारताचा महत्त्वपूर्ण भागीदार म्हटले. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याबद्दल जागतिक स्तरावर चिंता व्यक्त केली जात असताना, पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, भारत आणि इंडोनेशिया संरक्षण उत्पादन आणि पुरवठा साखळींवर संयुक्तपणे काम करण्यासाठी सहमत झालो आहोत. शनिवारी भारत आणि इंडोनेशियात सागरी सुरक्षा क्षेत्रात झालेल्या करारामुळे गुन्हेगारीस प्रतिबंध होईल. तसेच शोध आणि बचाव क्षेत्रातील सहयोगात अधिक वाढ होईल.

भारत आणि इंडोनेशियामध्ये इतर मुद्द्यांवर झालेले करार

पंतप्रधान नरेंद्र मोधी यांनी सांगितले की, दोन्ही देशांमध्ये इतर काही महत्वाच्या मुद्द्यांवर करार झाले आहेत. ज्यामध्ये फिनटेक, एआय, सागरी सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सुरक्षा दहशतवाविरोधी सहकार्य, कट्टरतावाद विरोधी सहकार्य

भारत अनेक देशांना शस्त्रे विकत आहे. आता इंडोनेशियाचीही या यादीत भर पडली आहे. इंडोनेशियाला शस्त्रे देऊन भारताने चीनला घेरण्याची तयारी सुरू केली आहे. भारताचे ब्रह्मास्त्र असणारे ब्रम्होस क्षेपणास्त्र इंडोनेशिया विकत घेणार आहे. दरम्यान हिंद महासागर आणि पॅसिफिक महासागराच्या क्षेत्रात चीनचे वर्चस्व कमी करण्यासाठी भारत आपल्या शेजारी राष्ट्रांशी चांगले संबंध प्रस्थापित करत आहे.

भारताच्या पहिल्या प्रजासत्ताक दिनी इंडोनेशिया राष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ७५ व्या प्रजासत्ताक दिनीही इंडोनेशियाचे राष्ट्रपतीच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असल्याचा उल्लेखही पंतप्रधान मोदींनी केला.

**महाभारत कॉरिडॉर ते ५० हजार सरकारी नोकऱ्या**

**भाजपासाठी निवडणुका जनसंपर्काचे माध्यम**

# दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजप पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीमध्ये सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यामध्ये सत्ताधारी आम आदमी पार्टीसह भाजपा आणि काँग्रेसही स्पर्धेत आहेत. दरम्यान गेल्या २६ वर्षांपासून भाजपा आणि ११ वर्षांपासून काँग्रेस सत्तेत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा हे दोन्ही पक्ष सत्ता मिळवण्यासाठी कडवी लढत देत आहेत. अशात यामध्ये भाजपाने जोरदार तयारी केली असून, आज त्यांनी त्यांच्या जाहीरनाम्याचा तिसरा भाग प्रसिद्ध केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते जाहीरनाम्याचा तिसरा भाग प्रसिद्ध केल्यानंतर त्यांनी माजी मुख्यमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली.

यावेळी अमित शाह यांनी गिग कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले आहे, तसेच त्यांना १० लाख रुपयांचा जीवन विमा आणि ५ लाख रुपयांचा आरोग्य विमा देणार असल्याचेही म्हटले आहे. शाह यांनी दिलेल्या आश्वासनांमध्ये दिल्लीतील तरुणांना ५०००० सरकारी नोकऱ्या, अनधिकृत वसाहतींमध्ये विक्री, खरेदीचे आणि नवीन बांधकामास परवानगी, उत्तर प्रदेश व हरियाणा यांच्या भागीदारीत महाभारत कॉरिडॉर आणि गुजरातमधील साबरमती नदीकाठासारखा यमुना नदीकाठाची निर्मिती यांचा समावेश आहे.

भाजपासाठी निवडणुका जनसंपर्काचे माध्यम

भाजपाने दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी तीन भागांत जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. आज त्याच्या तिसऱ्या भागाचे अमित शाह यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यानंतर बोलताना शाह म्हणाले, दिल्ली मी येथे दिल्ली निवडणुकीसाठी संकल्प पत्राचा (जाहीरनामा) शेवटचा भाग प्रकाशित करण्यासाठी आलो आहे. आम्ही निवडणुकांना सार्वजनिक संपर्काचे माध्यम मानतो, आम्ही जनतेच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी लोकांमध्ये जातो. भाजपसाठी संकल्प पत्र हा एक महत्त्वाचा विषय आणि निवडणुकीनंतर करावयाच्या कामांची यादी आहे.




ही केवळ कागदावर दिलेली आश्वासने नाहीत. २०१४ पासून, पंतप्रधान मोदींनी विकास कामांचे राजकारण स्थापित केले आहे आणि भाजपानेही जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. हा आमचा ट्रॅक रेकॉर्ड आहे, असे ते पुढे म्हणाले.

यावेळी तरुणांच्या रोजगारीवर बोलताना शाह म्हणाले की, आमचा पक्ष २० लाख स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणार आहे. यापूर्वी केंद्र सरकारने रस्ते बांधणीवर ४१,००० कोटी रुपये, रेल्वे लाईन टाकण्यासाठी १५,००० कोटी रुपये आणि दिल्लीतील विमानतळांसाठी २१,००० कोटी रुपये खर्च केले आहेत.

यावेळी अमित शाह यांनी, दिल्लीत भाजपाचे सरकार स्थापन झाले तरी, दिल्लीत सध्या सुरू असलेल्या कोणत्याही योजना बंद करणार नसल्याचे आश्वसनही दिले आहे.

**भाजपाच्या जाहीरनाम्यात दिल्लीकरांसाठी काय काय ?**

गिग कामगारांना (ऑनलाइन सेवा देणाऱ्या कंपन्यांतील कामगार) १० लाख रुपयांपर्यंत जीवन विमा आणि ५ लाख रुपयांपर्यंत अपघात विमा.

वस्त्रोद्योग कामगारांना १० लाख रुपयांपर्यंत जीवन विमा, ५ लाख रुपयांपर्यंत अपघात विमा आणि टूलकिट प्रोत्साहन म्हणून १५,००० रुपये.

बांधकाम कामगारांना टूलकिट प्रोत्साहन १०,००० रुपये, ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज, ५ लाख रुपयांपर्यंत अपघात विमा आणि १० लाख रुपयांपर्यंत जीवन विमा दिला जाईल.

तरुणांना ५०,००० सरकारी नोकऱ्या, २० लाख रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी, गरजू विद्यार्थ्यांना मेट्रोमध्ये मोफत प्रवासासाठी एनसीएमसीमध्ये दरवर्षी ४००० रुपये.

मान्यताप्राप्त माध्यम प्रतिनिधी आणि वकिलांना १० लाख रुपयांपर्यंतचा जीवन विमा आणि १० लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य आणि अपघात विमा.

भव्य महाभारत कॉरिडॉर विकसित करणार.

यमुना नदीचे पुनरुज्जीवन करून यमुना रिव्हर फ्रंट विकसित केला जाईल.

हाताने मैला साफ करण्याचे काम १०० टक्के बंद केले जाईल, कामगारांना कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी देण्यात येतील.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला समाज कल्याण मंत्रालयाच्या योजनांचा आढावा

## आर्किटेक्ट नियुक्त करून स्मारकाचे संकल्पचित्र आणि प्लॅन त्वरित तयार करण्यात यावा : ना. रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत आज पुणे येथे समाज कल्याण आयुक्तालय येथे समाज कल्याण च्या विविध योजना आणि कामकाजाचा आढावा घेणारी बैठक झाली.यावेळी भिमा कोरेगव येथील विजय स्तंभ स्मारक बाबत ही बैठक घेण्यात आली. साडे नऊ एकर जमिनीवर भीमा कोरेगाव स्तंभाचा परिसर असून येथील रिक्त जमीन भीमा कोरेगाव स्मारकासाठी भूमी अधिग्रहण त्वरित करावे त्यासाठी आर्किटेक्ट नियुक्त करून स्मारकाचे संकल्पचित्र आणि प्लॅन त्वरित तयार



करण्यात यावा असे निर्देश आज ना.रामदास आठवले यांनी अधिकाऱ्यांना दिले.

स्थानिक स्वराज्य संस्था; विधानसभा ; लोकसभा निवडणुका अनुसूचित जाती जमाती च्या राखीव जागांवर लढविण्यासाठी उमेदवारांनी निवडणुकी आधीच जात पडताळणी करावी याबाबत ची सूचना ना.रामदास आठवले यांनी केली असून याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि निवडणूक आयोगाला ही आपण पत्र पाठवून सूचना करणार आहोत. त्यामुळे अनुसूचित जाती जमातीच्या राखीव जागांवर बोगस प्रमाणपत्रावर अन्य उमेदवार त्या जागा गिळंकृत करणार नाही अशी अपेक्षा ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

बार्टी च्या १२०० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढवावे; जात पडताळणी समितीच्या रिक्त जागा त्वरित भरण्यात याव्यात आणि जात पडताळणी मधील दिरंगाई टाळावी याबाबत ना.रामदास आठवले यांनी निर्देश दिले.

यावेळी समाज कल्याण आयुक्त श्री ओमप्रकाश बकोरिया, बार्टीचे महासंचालक श्री सुनील वारे, अतिरिक्त आयुक्त सुरेश पवार, सह आयुक्त प्रमोद जाध, प्रशांत चव्हाण, समाज कल्याण अधिकारी राधा किसन देव्हढे, विशाल लोंढे, स्वाती इथापे, गणेश मरकड, किशोर बडगुजर, रामदास लोखंडे आदी अधिकारी आणि विजय मगरे, महेंद्र मानकर, शैलेश चव्हाण, संजय सोनवणे, असित गांगुर्डे महिपाल वाघमारे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# लोकशाही बळकट करण्यासाठी चांगल्या मतदाराची गरज : नायब तहसीलदार पांडुरंग वाडेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



परंडा/प्रतिनिधी : लोकशाही बळकट करण्यासाठी चांगल्या मतदारांची गरज आहे असे प्रतिपादन परंडा येथील नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर यांनी शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय व तहसील कार्यालय परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून परंडा येथील नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर नोडल अधिकारी तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे प्रा विजय जाधव प्रा रणजीत वरपे तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी प्रा विजय जाधव प्रा रणजीत वरपे यांनीही आपली मनोगत व्यक्त केली. पुढे बोलताना नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर म्हणाले की देशातील लोकशाही टिकविण्यासाठी २१ व १८ वर्ष पूर्ण झालेल्या तरुण-तरुणींनी आपल्या मताची नोंदणी करून मतदान केले पाहिजे. समाजात मतदान जागृती केली पाहिजे. तरुण युवकांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन राष्ट्रीय कार्य केले पाहिजे. तरुण मतदारांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकारने प्रत्येक वर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या स्थापना दिनानिमित्त २५ जानेवारी २०११ पासून याची सुरुवात करण्यात आली आहे. राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कनिष्ठ वरिष्ठ भागातील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी अमोल हंकारे ,ज्ञानेश्वर गुळमिरे, यशपाल बनसोडे, जीवन बनसोडे, हनुमंत करळे इत्यादी तहसीलचे कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमासाठी भागवत दडमल उत्तम माने सुजित पवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ शहाजी चंदनशिवे यांनी केले तर आभार प्राध्यापक रणजीत वरपे यांनी मानले.

# गौडगाव पंचाचार्य प्रशालेत मतदार जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट : लोकशाहीत निवडणुकीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे सरकार बनवण्याच्या प्रक्रियेत सर्वांनी सहभागी व्हावे. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव येथील श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत मतदार जनजागृती करण्यात आले.

प्रारंभी आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून आपल्या देशाच्या लोकशाही परंपराचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, अंश, जात, समाज व भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी परमेश्वर व्हसुरे यांनी सामूहिकरीत्या विद्यार्थी व मतदारासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. ज्यांचे वय १८ वर्ष पूर्ण झालेले आहे अशांना मतदार नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करावे. असे आवाहन ही करण्यात आले. मतदार जनजागृती आपलं मत,आपला हक्क आपला मतदान, देशाचा भविष्य मतदान करा, आपल्या हक्काचा वापर करा असे घोषवाक्य व जेऊरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत भालेराव वस्तीत प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी, लाडाप्पा शिंदे, महेश स्वामी, शिवपुत्र चोळे, शरणय्या हिरेमठ, वीरेश धानशेट्टी, श्रीशैल सवळतोट, श्रावण भालेराव, सोनाली साठे, रेणुका चानकोटे उपस्थित होते.

# डॉ. भारती बावदाने व विधानसभाप्रमुख डॉ. सुबोध बावदाने यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १२३ मध्ये शिवसेना शिवकार्य सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : महाराष्ट्राच्या घराघरात फडकू दे भगवा शिवसैनिक नोंदणी करून शिवकार्य जागवा या एकनाथ शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विक्रोळी पश्चिम मधील प्रभाग क्रमांक १२३ मध्ये डॉ. भारती बावदाने व घाटकोपर पश्चिम विधानसभाप्रमुख डॉ.सुबोध बावदाने यांच्या वतीने शिवसेना शिवकार्य सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

यावेळी प्रभाग क्रमांक १२३ मधील असंख्य महिला-पुरुष व युवक - युवती यांनी माजी नगरसेविका डॉ. भारती बावदाने व विधानसभाप्रमुख सुबोध बावदाने यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिवकार्य मध्ये आपली नोंदणी केली आहे. त्यामुळे आतापर्यंत याठिकाणी शिवसेना शिवकार्य सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

# कुटुंबातील एकालाच मिळणार पीएम किसान योजनेचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (जिमाका) : पीएम किसान योजनेसाठी केंद्र सरकारने नियमावली लागू केली आहे. या योजनेअंतर्गत एकाच कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा, मुलगी लाभ घेत असल्यास त्यातील एकालाच यापुढे या योजनेचा लाभ घेता येणार आहे. नोकरदार, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पेन्शनर, आयकर भरणारे लाभार्थी कायमस्वरूपी वगळण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थी वर्गवारीनिहाय पडताळणी करण्याची प्रक्रिया तालुकास्तरावर मोहिम स्वरूपात चालू आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये एकुण १ लाख ५९ हजार ६७० लाभार्थांना विविध कारणाने पी.एम. किसान पोर्टलवर अपात्र करण्यात आले आहे. सदर लाभार्थ्यांच्या अपात्रतेच्या कारणांची पडताळणी करण्यासाठी तालुकास्तरावर यादी जिल्हास्तरावरून उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर यादीमधील पात्र लाभार्थ्यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात क्षेत्रिय कर्मचारी यांचेमार्फत ७/१२, फेरफार (६ड) उतारा, आधार कार्ड, कुटुंबातील इतर व्यक्तीचे आधार कार्ड (पती-पत्नी १८ वर्षाखालील अपत्य) इ.कागदपत्रे तालुकास्तरीय क्षेत्रिय अधिकारी यांचेकडे जमा करण्यात यावी.

जिल्ह्यातील जे शेतकरी पात्र असूनही त्यांचे नाव अपात्र यादीत समाविष्ट आहे. अशा सर्व शेतकऱ्यांनी त्यांच्या त्यांच्या गावातील कृषि सहायक यांच्याशी संपर्क साधून पात्रतेसाठी आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता तात्काळ करावी. जेणे करून सदर लाभार्थ्यांचा लाभ पुर्नज्जीवित करण्याची प्रक्रिया तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येईल. ज्या लाभार्थ्यांची कागदपत्रे उपलब्ध होणार नाहीत असे लाभार्थी या योजनेपासून कायमस्वरूपी अपात्र होतील.

पी.एम.किसान योजना अंतर्गत अपात्रतेचे निकष - एकाच कुटुंबातील लाभार्थी (पती-पत्नी १८ वर्षाखालील अपत्य वगळून)., राज्याचा रहिवाशी नसलेले लाभार्थी , संविधानिक पदावरील व्यक्ती, माजी संविधानिक पदावरील व्यक्ती, केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था निमशासकीय कर्मचारी,जमिन विक्रीमुळे भूमिहिन लाभार्थी,संस्था मालकी असलेल्या जमिनधारक,नोंदणीकृत व्यवसायिक,सलग ३ वर्ष आयकर भरणारे लाभार्थी, स्वत:लाभ समर्पित केलेले लाभार्थी, वयोवृध्द, सेवा निवृत्तीधारक लाभार्थी,जमिनीची मालकी स्वत: नावे नसलेले लाभार्थी,दुबार नोंदणी असलेले,शेती शिवाय इतर कारणासाठी वापरणारे जमिनधारक,अनिवासी भारतीय,खोटी माहिती द्वारे नोंदणी केलेले लाभार्थी. या योजनेतून अपात्र करण्यात येतील असेही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी कळविले आहे.

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या चक-१३ एढ मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्विकारण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे.

वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयात गर्दी होते. त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने मिळावा. यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरून हवे असतील त्यांनी दिनांक २९ जानेवारी २०२५ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायं ४.०० या वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी , पत्याचा पुरावा, आळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, डीडी फक्त ऊ ठ.ढ.ज. डजड्झणठ यांच्या नावे नॅशनलाईज अथवा शेड्युल्ड बँकेचा असावा.अर्जासोबत पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

एक नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी सायं. ०५.०० वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी दि. ३० जानेवारी २०२५ रोजी सीलबंद लिफाफ्यात दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी १०००/- रुपये पेक्षा कमी रकमेचा नसावा. दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदारासमोर लिफाफे उघडून ज्या अर्जदाराचे विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही. असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी पत्रकान्वये कळविले आहे

दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (चक१३ एढ)

दि.२९ जानेवारी २०२५ - तिप्पट शुल्काचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे वेळ -११ ते ०४

दि.२९ जानेवारी २०२५ -सायंकाळी ०५.०० वा. डबल आलेल्या अर्जांची यादी जाहीर.

दि.३० जानेवारी २०२५ -दूपारी २ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे

रु. १०००/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.

दि.३० जानेवारी २०२५ -तिप्पट आलेल्या शुल्काच्या अर्जासाठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जाचा लिलाव दुपारी ४ वाजता.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकरी वर्गासह सर्व ग्राहकांचा फायदा होणार

## महावितरण चे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांची माहिती

# येत्या पाच वर्षांत घरगुती विजेचे दर २३ टक्क्यांनी कमी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे पुढील दोन वर्षांत कार्यरत होणाऱ्या सौर उर्जा प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार असून घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक यांनाही मोठा फायदा होणार आहे. सौर उर्जा प्रकल्पांमुळे आगामी पांच वर्षांत १०० युनिट पर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ प्रति युनिट पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे दर ११.८२ रु. प्रति युनिट पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होतील, एक एप्रिल पासून महावितरण च्या घरगुती ग्राहकांना दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळू लागतील. अशी माहिती महावितरण चे स्वतंत्र संचालक व भाजपा प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शुक्रवारी दिली.




१०० युनिट पर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचा दर ११.८२ रु. पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव महावितरण ने राज्य वीज नियामक आयोगापुढे ठेवला असल्याचेही श्री. पाठक यांनी नमूद केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. पाठक बोलत होते. प्रदेश भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सौर ऊर्जा निर्मितीच्या धडाकेबाज कार्यक्रमामुळेच शेतकरी , घरगुती व औद्योगिक ग्राहकांचा फायदा होणार असल्याचे श्री. पाठक यांनी स्पष्ट केले.

ॅश्री. पाठक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे राज्यात आगामी दोन वर्षांत १६ हजार मेगावॅट एवढी सौर वीज निर्मिती होणार आहे. त्याचा मोठा फायदा महावितरण ला होणार आहे. महावितरण चा सरासरी वीज पुरवठ्याचा दर कमी होणार असल्यामुळे १०० युनिट वापर असणाऱ्या ग्राहकांचे वीज दर ७ रु. ६५ पैशा पासून (प्रती युनिट) ५ रु. ८७ पैसे पर्यंत म्हणजेच २३ टक्क्यांनी कमी होतील तर १०१ ते ३०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांचे दर सरासरी १३.४९ रु. प्रति युनिट रु.११.८२ पर्यंत म्हणजेच १२ टक्क्यांनी कमी होतील, अशी आशाही श्री. पाठक यांनी व्यक्त केली . औद्योगिक ग्राहकांसाठीच्या सर्व सवलत, प्रोत्साहन योजना चालू ठेवण्यात येतील तसेच औद्योगिक ग्राहकांना क्रॉस सबसिडी देण्याची गरज पडणार नसल्याची माहितीही श्री. पाठक यांनी दिली.

श्री. पाठक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे अनेक फायदे पुढील पाच वर्षांत ग्राहक आणि महावितरण ला होणार आहेत. महावितरण चा सरासरी वीज पुरवठ्याचा दर सध्याच्या ९ रु. ४५ पैसे या दरावरून २०२९ - ३० पर्यंत ९ रु. १४ पर्यंत खाली येणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दागिने असलेली महिलेची पर्स लंपास, गुन्हा दाखल

सोलापूर : विडी घरकुल येथील मेघा नॉवेल्टी दुकानांमध्ये फिर्यादी लक्ष्मी विजय पोतदार (वय-५२,रा.किसन संकुल,अक्कलकोट रोड) या गेल्या होत्या. दुकानात असलेल्या काउंटरवर ठेवलेली फिर्यादी यांच्या पर्समधील ३० ग्रॅम सोन्याचे गंठण व सोनेरी रंगाची पर्स असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा ऐवज होता. दरम्यान,त्यावेळी फिर्यादी यांच्या बाजूलाच उभे असलेली अज्ञात महिलेने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय पर्स चोरून नेली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली, गुन्हा दाखल

सोलापूर प्रतिनिधी) पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१२. एलजी.२८९२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेण्याची घटना २१ ते २२ जानेवारी दरम्यान पोर्टल चाळ येथे घडली.याप्रकरणी अक्षय जगदीश गामीत (वय-३३,रा. सोनटक्के हाऊस,संतोष नगर,बाळे) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पापडे हे करीत आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष'

## वैद्यकीय मदतीसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली, अर्जासाठीची प्रक्रिया पेपरलेस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे

**मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे.**

पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

# नांदूरमधमेश्वर येथील घरफोडी करणारा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नांदूरमधमेश्वर येथे घराच्या मुख्य दरवाजाची कुलूप उघडून घरामधील असलेल्या लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडून कपाटातील सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम असा२,०३,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला होता, याबाबत निफाड पोलीस ठाण्यात गुरनं२९/२०२५ बी.एन.एस.३०५(अ)३३१(३) गुन्हा दाखल करण्यात आला होता,

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मीरखेलकर ,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश पालवे, यांनी सदर घटनेतील अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी निफाड पोलीस ठाणे सूचना दिल्या होत्या त्यानुसार निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव तपासी अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील व तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी गुन्ह्यातील फिर्यादी यांच्याकडे चौकशी करून यातील अज्ञात आरोपीचा परिसरात शोध घेतला असता घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले व काही संशयित हालचाली वरून सदर आरोपी हे आसपासचे असल्याचे तर्क लावून तपास सुरू केला त्यानुसार संशयित आरोपीची सखोल चौकशी करून गुन्हा उघडकीस आणला आहे ,त्यामध्ये आरोपीकडून गुन्ह्यात गेलेले सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे ,सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील हे करीत आहे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक देशमाने अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश पालवे निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव तपासी अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर पाटील तसेच पोलीस हवालदार ढिकले, शेरेकर ,खरात ,जाधव, सोनवणे ,जाधव ,गायकवाड ,शिंदे ,यांचे पथकाने वरील गुन्ह्यातील आरोपी व गुन्ह्यातील मुद्देमाल २४ तासाच्या आत हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे, निफाड पोलिसांच्या या कामगिरीबद्दल परिसरातून त्यांचे कौतुक केले जात आहे,

**आरोपीस २४ तासात पकडण्यात निफाड पोलीसांची कामगिरी**

# आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशनतर्फे खा. प्रणिती शिंदे यांना निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखा सोलापूरचे पदाधिकारी माजी सैनिक प्रकाश घटकांबळे. माजी सैनिक लिंबाजी कांबळे,माजी सैनिक अशोक कांबळे, माजी सैनिक सूर्यकांत गजघाटे, माजी सैनिक प्रमोद जाधव यांनी सोलापूरचे खासदार माननीय प्रणिती ताई शिंदे यांना सिपाई प्रभाकर बायाजी पात्रे, विरचक्र ( मरणोप्रांत ) यांचा पूर्णकृती पुतळा बसविणे बाबत तसेच सोलापूर शहरांमध्ये माजी सैनिकाचे विश्रामगृह बांधणेसाठी चर्चा करून निवेदन दिले.

# जनता विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला . मतदानाइतके अमूल्य नसे काही, बजावू हमखास मताधिकार आम्ही ही राष्ट्रीय मतदार दिनाची मराठीतील थिम आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेतली. उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मतदार प्रतिज्ञा दिली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.यावेळी वाजे यांनी लोकशाहीची व्याख्या, लोकशाहीत मतदानाचे महत्त्व ,मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग,नवमतदार नोंदणी याविषयी सविस्तर माहिती दिली.सूत्रसंचालन सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सुनिल ससाणे यांनी मानले.यावेळी कचेश्वर शिंदे,सोमनाथ पगार, शिवाजी गुरुळे,डी.ए.रबडे,अरुण डावरे रामदास वारुंगसे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत ,राजेंद्र गांगुर्डे, उत्तम कामडी, अलका काळोगे, विद्या ठाकरे, किशोर शिंदे, रवि गोजरे, ऋषिकेश कुंदे, ज्ञानेश्वर कडभाने, निवृत्ती बर्गे, संकेत जाधव आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी घेतली प्रतिज्ञा**

# मविप्र जिल्हास्तरीय सांस्कृतिक महोत्सवात निफाडचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मविप्र सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत* विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. मविप्र च्या वतीने तालुका स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते , या मध्ये यशस्वी झालेल्या संघाचे जिल्हा स्तरीय स्पर्धेत निवड करण्यात आली होती ,यात निफाड महाविद्यालयातील (उच्च माध्यमिक विभाग) संघाने घवघवीत यश संपादन केले असून,

'वैयक्तिक गीत गायन' या कला प्रकारात कु.आदित्य बर्वे या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय




तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले तर 'समूह नृत्य' कला प्रकारात कु. प्रज्ञा तांबे व ग्रुप यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले

या स्पर्धेत कू. श्रुती काळे,विशाखा गांगुर्डे,नेहा म्हैसधूने,कल्याणी ढोमसे, सृष्टी निकाळे, प्रांजल हांडोरे,कविता ताती,ऋतुजा बेंद्रे,प्रज्ञा तांबे,मानसी सोनवणे,दीक्षा उगले, हे सहभागी झाले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना श्रीमती मनीषा कोटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल म.वि.प्र. समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष श्री विश्वासराव मोरे, संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.)सुरेशजी जाधव, प्रा.अभय वडघुले, डॉ. प्रवीण ढेपले आणि सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठक संपन्न

**उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर**

# प्राणी क्लेष प्रतिबंधक कायद्याची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा २०१५ प्राणी क्लेष कायदा १९६० वाहतूक नियम मधील तरतुदीचे पालन करणे गरजेचे असून, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध आहे. बैलगाडीतून साखर कारखान्याकडे ऊस वाहतूक करताना बैलांवर होणाऱ्या क्रुरतेस प्रतिबंध आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने जिल्ह्यात प्राणी क्लेश कायद्याच्या नियमांची अंमलबजावणी करून सुव्यवस्था राखण्याच्या सुचना उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा वन अधिकारी कार्यालयाचे गोवर्धन चोपडे, महानगरपालिकेचे डॉ. सतिश चौगुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, पोलीस निरिक्षक नामदेव शिंदे, पोलीस निरिक्षक बाळासाहेब भरणे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले, प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर विभागाचे आर. एस. राठोड, इंदेश्वर शुगर बार्शीचे व्यवस्थापकीय संचालक ए. एस. जाधव आदी उपस्थित होते.

प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत प्राण्यांची पायी वाहतूक नियम २००१ या कायदा व नियमांच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनावरांची वाहतूक करण्यात येऊ नये. सदर अधिनियमातील कलम ११ (१) (क) नुसार कोणत्याही व्यक्ती कोणत्याही प्राण्यांला मारणे, त्याच्यावर अधिक भार लादणे, प्राण्यांना क्रुरतेने अधिक दामटणे, त्याच्या वर क्षमतेपेक्षा जास्त वजन वजनांचा भार देणे, त्यांच्या छळ करणे किंवा त्या प्राण्यांना उगीच वेदना व यातना होतील अश्या बाबींच्या विषयी दंड व कारावासाची शास्ती नमूद आहे. तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या मसुदा आणि पॅक १९६५ च्या नियम ६ नुसार जनावरांना दिवसभरातून नऊ तासाहून अधिक काळ वाहतुक करु देऊ नये तसेच तापमान ३७ अंश सेल्सियस पेक्षा जास्त असेल अश्या ठिकाणी दुपारी १२.०० ते ३.०० वेळेमध्ये विश्रांती देण्यात यावी अशा सुचनाही बैठकीत दिल्या. प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या कायद्यांतर्गत प्राण्यांची पायी वाहतूक नियम २००१ च्या नियम १२ नुसार सुर्योदयापूर्वी किंवा सुर्यास्तानंतर कोणत्याही व्यक्तीने जनावरांची पायी ने-आण करु नये तसेच जनावरे (बैल) ३० किमी किंवा ८ तास व खाण्यापिण्यासाठी ४ किलोमीटर प्रति २ तास यापलीकडे प्राण्याची पायी ने-आण करता येणार नाही असे अधिसूचित केले आहे.तसेच बैलगाडा शर्यतीचे




आयोजन करताना परवानगी घेऊन करावी विना परवानगी शर्यतीचे आयोजन करु नये असे आवाहनही उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### लोखंडी कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न

सोलापूर : लोखंडी कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.ही घटना २२ जानेवारी रोजी दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास मुल्लाबाबा टेकडी या ठिकाणी घडली.याप्रकरणी उमर बडेसाह पटेल (वय-४२,रा.सिद्धेश्वर पेठ,मुल्ला बाबाटेकडी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोहेल उर्फ कासिम शेख (रा.मुल्लाबाबा टेकडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी याने फिर्यादी यांच्या किराणा दुकानात दारूच्या नशेत येऊन फिर्यादी यांच्या वडिलांना विनाकारण शिवीगाळ करून मारहाण केली.याबाबत फिर्यादी यांनी वरील संशयित आरोपी याला विचारणा करण्यासाठी गेले असता,सोहेल याने शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी देत लोखंडी कोयत्याने फिर्यादी यांच्या डोक्यात तीन ते चार वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.तसेच तेथे जमा झालेल्या लोकांना दमदाटी व शिवीगाळ करून दहशत निर्माण केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहेत.पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक खंडागळे हे करीत आहेत.

# राष्ट्र उभारणीत नव मतदारांची भुमिका महत्वाची : अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या ‘विशेष श्रमसंस्कार शिबिरा’चे सरपंच वल्लभ घोडके यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : भारत हा देश लोकशाहीप्रणालीचा आदर करणारा देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जा-तो. लोकशाही प्रणालीमध्ये प्रत्येक नागरीकाला आपले अधिकार आहेत. आपल्या लोकशाहीप्रणालीमध्ये मतदानास अनन्य साधारण महत्त्व आहे. निवडणूकीच्या माध्यमातून आ-पला व आपल्या परिसराचा विकास साधण्यासाठी उमेदव-राला आपण मतदानाच्या प्रक्रियेतून निवडून देतो. आपण कुठलीही जात धर्म समोर न ठेवता राष्ट्र उभारणीसाठी नव मतदार लोकशाहीम ध्ये उत्फूर्तपणे सहभागी झाला पाहिजे व इतरांनाही मतदान करण्यास प्रवृत्त केले पाहिजे, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांनी केले.

**लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची जबाबदारी ही नवतरूणांची असून जास्तीत जास्त तरुणांनी आपले नाव मतदार यादीमध्ये नोंद करून घ्यावे व देश घडविण्याचे महान काम करून मतदान प्रक्रियेत सहभाग हा मुख्य उद्देश असल्याचे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून नव तरूण मतदारांना राष्ट्रीय मतदान दिनाची शपथ घेतली. तसेच नव मतदारांना प्रमाणपत्र देण्यात आली.**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्दे शानुसार दिनांक २५ जानेवारी राज्यासह देशभरामध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्यावतीने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, प्रांताधिकारी निलेश पाटील, नायब तहसिलदार प्रवीण घम तसेच महसूल-चे अधिकारी, कर्मचारी संगमेश्वर महाविद्यालय व दयानंद कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

नव तरूण मतदारांनी आपल्याला नागरिक म्हणून तुमचा धर्म आणि जात सांगून सक्षम राज्य व देश घडविण्याचे काम करावे व तरूणांच्या मनातील नकारात्मक विचार बाजूला करण्यासाठी आ-पला तरूण वर्ग लोकशाहीमध्ये उत्फूर्तपणे सहभागी झाला पाहिजे म्हणून राष्ट्रीय म तदार दिवस साजरा करण्यात येतो असे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांनी सांगितले.




यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसिलदार निलेश पाटील यांनी केले. प्रारंभी कार्यक्रमाची सुरवात अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी पत्राद्वारे सैनिकांना दिल्या शुभेच्छा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी) /संजय चव्हाण : सैनिक टाकळी ता.शिरोळ येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व पोस्ट ऑफिस टाकळी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिन व लष्कर दिनानिमित्त येथील विद्यार्थ्यांनी देशाच्या शूर सैनिकांबद्दल कृतज्ञता आणि कौतुक व्यक्त करण्यासाठी सैनिकांना पत्रे लिहून देशासाठी केलेल्या निःस्वार्थ सेवेबद्दल त्यांचे आभार मानले.

हा उपक्रम सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या बलिदानाची कबुली देत विद्यार्थ्यांनी पत्रांमध्ये आपले हृदय ओतले.

एका विद्यार्थ्याने लिहिले, तुमच्या शौर्याबद्दल आणि त्यागासाठी आम्ही कृतज्ञ आ-होत. तुम्ही आमच्या देशाचे खरे हिरो आहात.

ही पत्रे गोळा करून सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना पाठवण्यात आली, विद्यार्थ्यांच्या मनः पूर्वक शुभेच्छा राष्ट्राला आपल्या सैनिकांबद्दल असलेल्या कौतुकाची आणि आदराची आठवण करून देतात.

तरुण पिढीमध्ये देशभक्ती आणि राष्ट्रवाद वाढवण्याचा हा एक उत्तम मार्ग म्हणून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विनोद पाटील, पोस्ट मास्टर रोहित शिंगे, पोस्टमन पी.बी.कोरे, दिनकर म ाळगे, तानाजी कागवाडे, प्रथमेश चौगुले, एम.एम.धुमाळे, सयाजी पाटील उपस्थित होते.

## चारचाकी कार चोरट्याने पळवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) पुना नाका येथे चार चाकी इनोव्हा कार क्रमांक एम.एच.१२.एचझेड.१५४८ ही पार्क केलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ जानेवारी रोजी रात्री नऊ ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी गणेश अशोक पिंपळे (वय-३९-,रा.लक्ष्मी नगर,चंडक शाळेजवळ,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पो-लीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या सिंदखेडराजा तालुका अध्यक्षपदी डॉ. गंगाराम उबाळे, उपाध्यक्षपदी पत्रकार समाधान सरकटे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : ग्रामीण भागात पत्रकारीता क्षेत्रात काम करत असलेले समाधान सरकटे यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना सिंदखेडराजा तालुका उपाध्यक्षपदी यांची निवड आज दिनांक २३ जानेवारी रोजी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. समाधान सरकटे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी कष्टकरी सामाजिक याविषयीच्या प्रश्नाना लेखणीतून माध्यमातून वाचा फोडण्याचे काम गेल्या १० वर्षांपासून करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत साखरखेर्डा येथे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रताप मोरे व उपाध्यक्ष अशोक इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा सचिव प्रल्हाद देशमुख व जिल्हा कोषाध्यक्ष सचिन खंडारे , राजेंद्र मोरे या पत्रकारांच्या उपस्थितीमध्ये सिदखेडराजा तालुका उपाध्यक्षपदी समाधान सरकटे यांची निवड करण्यात आली आहे त्यांच्या निवडी बद्दल त्याचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केल जात आहे.

## २८ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ घ्यावी : राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लातूर : आता पर्यंत नोंदणी केलेल्या एकूण शेतकरी बांधवापैकी केवळ ५० टक्के शेतक-याचे सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राहिलेल्या ५० टक्के शेतकऱ्याचे ३१ जानेवारीपर्यत इतक्या कमी कालावधीत खरेदी करणे अशक्य आहे. त्यामूळे सोयाबीन खरेदीला २८ फेब्रुवारी पर्यंत मुद-तवाढ घ्यावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिति उपसभापती संतोष सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी केली आहे.

खरेदीच्या सुरुवातीला आद्रता आणि त्यानंतर बारदाना च्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन घालता आलेली नाही. नोंदणीकृत शेतक-याची एकूण संख्या आणि बाज-ारात भाव मिळत नसल्याने, हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कौल पाहता अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतक-याना हम ीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी २८ फेब्रुवारी पर्यंत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिति संघाचे उपसभापती संतोष सोमवशी यांनी केली आहे.

# अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय व सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वछता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





सोलापूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जानेवारी २०२५ रोजी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना शंभर दिवस उद्धीष्टपूर्ती बाबत सात सूत्री कार्यक्रम दिला होता, त्यांअनुषगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी स्वच्छता मोहीम ही केवळ अभियान अथवा प्रशासकीय न ठेवता आपल्या कार्यक्षेत्रातील रास्त भाव धान्य दुकानदारांना देखील सदर मोहीमेत सहभागी होण्यास आ-वाहन केले होते शनिवार रोजी सकाळी अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय व सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वछता अभियान राबविण्यात आले.

यावेळी रेशन दुकानदार ही स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

अन्नधान्य वितरण कार्यालयातील साफसफाई,रेकॉर्ड मेन्टन सह सोबतच आजूबाजूच्या परिसरात शोभेची रोपेही लावण्यात आली त्यामुळे कार्यालयात प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे.

त्याच पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित प्रकरणी निकाली काढणे,अन्न दिन सप्ताह, लाभार्थींचे ई-के वाय सी,आधार व मोबाईल सिडिंग, सोप्या पद्धतीने ऑनलाईन नवीन व दुबार ई-शिधापत्रिका मिळविणे, स्वच्छ धान्य लाभार्थींना मिळावे याकरिता जनजागृती करण्यात आली तसेच अन्नधान्य वितरण कार्यालय अंतर्गत असलेल्या परिमंडळ कार्यालयात ही आलेल्या नागरिकांची कामे वेळेत व गतीने होतील यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

ही मोहीम प्रशासकीय न ठेवता आपल्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ कार्यालय व रेशन दुकानातही अश्याच पद्धतीने स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधित अधिकारी व दुकानदारांना आवाहन केले.

यावेळी नेहमीच आपल्या प्रशासकीय योजनेमध्ये यशस्वी,प्रभावी व आपल्या हटके कार्य पद्धती मुळे सतत अग्रेसर असणारे अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, लेखापाल वैभव ठोकळ, रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, पंच कमिटी सदस्य शिवशंकर कोरे, जिल्हा उपाध्यक्ष उमेश आस-ादे, अ झोन अध्यक्ष अभिजित सडडो, ब झोन अध्यक्ष बसवराज बिराजदार, सचिव राहुल पवार, जिल्हा सचिव राज कमटम, जिल्हा संपर्क प्रमुख नितीन पेंटर सह बहुसंख्य शासकीय कर्मचारी व रास्त भाव धान्य दुकानदार उपस्थित होते.

**इंदापूर महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा**

**डॉ. पंडित विद्यासागर यांचे प्रतिपादन**

# कौशल्यधारीत शिक्षण पद्धती करिता नवीन शैक्षणिक धोरण पूरक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

इद्रापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शाहीर अमर शेख सभागृहामध्ये राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या म ार्गदर्शनाखाली खटउ विभागाच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरणावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले की नवीन शैक्षणिक धोरण हे कौशल्यधारीत शिक्षण पद्धती करीता पूरक आहे. विद्यार्थी , पालक आणि शिक्षकांनी हे धोरण समजून घेणे आवश्यक आहे .

डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले की ,’ सामाजिक गरजा बदलत असल्यामुळे शैक्षणिक धोरण बदलण्याची आवश्यकता असते .विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी , मूल्य शिक्षणाची जाणीव व जोपासना होण्यासाठी , नवनिर्मितला चालना देण्यासाठी , कृतिशील शिक्षण म ूल्यमापन पद्धती , शिक्षकांच्या अध्यापन व अध्ययन पद्धतीमध्ये बदल करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. स्वायत्त महाविद्यालय निर्माण करणे हा या धोरणाचा उद्देश आहे.’

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे अध्यक्षीय भाषणामध्ये म्हणा-ले की ,’नवीन शैक्षणिक धोरणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे.’ यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सदाशिव उंबरदंड उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्याम सातार्ले यांनी केले. कला शाखा विभाग प्रमुख डॉ. भिमाजी भोर यांनी आभार मानले.

